# नि.दि.दावा क्र.८३/२०१३ मधील नि.५ वरील आदेश

(दिनांक ०५ मार्च, २०१४ रोजी पारित केले)

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहिता आदेशीका ३९ नियम १ व २ प्रमाणे दाखल केला आहे. अर्जातील नमुद मिळकत मौजे धनसार, ता. पालघर, जिल्हा ठाणे येथील सर्वे/गट क्र.२०३, क्षेत्र ०—५६—१ हे.आर. ही जमीन मिळकत श्री. नाना लक्ष्मण भंडारी यांच्या मालकीची आहे. सदर मिळकतीमध्ये वासूदेव नाना भंडारी उर्फ पाटील व श्रीमती लक्ष्मीबाई नाना भंडादी उर्फ पाटील उर्फ श्रीमती लक्ष्मीबाई अर्जुन ठाकूर यांचा प्रत्येकी १/२ अविभाज्य हिस्सा होता व आहे. सदर मिळकतीला यापुढे 'वाद मिळकत क्र.१' असे सोयीसाठी संबोधले आहे.

वासूदेव नाना भंडारी यांच्याकडे कुळ कब्जेदार मालक म्हणून मौजे माहिम, वागुळसार, ता. पालघर, जिल्हा ठाणे येथील सर्वे क्र.८२८, हिस्सा क्र. पैकीचे एकूण क्षेत्र ३—६६—० हे.आर. मधील १ एकर ५ गुंठे जमीन होती वा आहे. या जमीनीची कुळकायद्यातील तरतुदीप्रमाणे विक्री होणे बाकी आहे. सदर मिळकतीला यापुढे 'वाद मिळकत क्र.२' असे सोयीसाठी संबोधले आहे.

वासूदेव नाना पाटील व बेबीबाई वासूदेव पाटील यांनी त्यांच्या हयातीत कधीही मृत्यूपत्र केलेले नव्हते व नाही. वासूदेव नाना पाटील यांनी कुळ कायद्यातील तरतुदीप्रमाणे खरेदी केलेल्या जमीनी खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | गांव | सर्वे/गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर |
|---|---|---|---|---|
| १ | माहिम | ३७३ | २ | १—५९—१ |
| २ | माहिम | ९०१ | २ | ०—०२—० |
| ३ | माहिम | ९०२ | १ | ०—७३—१ |

वरील तीनही मिळकती कुळ म्हणून वासूदेव नाना भंडारी हे कसत होते. त्याप्रमाणे महसुल दप्तरी फेरफार क्र.३३५४ मंजूर करण्यात आला आहे. त्या जमीनींची कुळ कायद्यातील तरतुदीप्रमाणे श्री. वासूदेव नाना भंडारी यांच्या नावे विक्रीही करण्यात आली आहे. त्याप्रमाणे महसुल दप्तरी फेरफार क्र.८९८० मंजूर करण्यात आला आहे. तसेच श्री. वासूदेव नाना पाटील यांनी दिनांक

१९/१२/१९५३ रोजीच्या खरेदीखतान्वये श्री. बाबु गोविंद गावड व २ यांचेकडून खालील वर्णनापैकी १/२ हिश्श्याच्या जमीनी खरेदी केल्या आहेत.

| अ. क्र. | गांव | सर्वे/गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर |
|---|---|---|---|---|
| १ | माहिम | ३७१ | ५ | ०—१२ |
| २ | माहिम | ९०१ | ३ | ०—१० |
| ३ | माहिम | ८२८ | २ | ५—२८ |
| ४ | माहिम | ८३१ | ६ | ०—२८ |

वर नमुद केलेल्या जमीनपैकी १/२ जमीन ही खरेदी करण्यात आली आहे. त्याप्रमाणे महसुल दप्तरी फेरफार क्र.५२३४ मंजूर करण्यात आला आहे. वर नमुद केलेल्या जमीनी व्यतिरिक्त श्री.वासूदेव नाना पाटील यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या जमीनी असून खालील वर्णनाची घरे आहेत.

| अ. क्र. | गांव | सर्वे/गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर |
|---|---|---|---|---|
| १ | माहिम | ३७० | २ | १—५६—८ |
| २ | माहिम | ३७४ | — | ०—२३—० |
| ३ | मौजे माहिम येथील ग्रामपंचायत घर क्र.२२५९ व २२६० चे घर | | | |

वरील सर्व मिळकतीस यापुढे ‘वाद मिळकत क्र.३’ असे सोयीसाठी संबोधले आहे. वाद मिळकत क्र.१, वाद मिळकत क्र.२ आणि वाद मिळकत क्र.३ यांना एकत्रितपणे ‘दावा मिळकती’ असे संबोधण्यात आले आहे.

२) वादीचे कथन थोडक्यात पुढील प्रमाणे;

वादी व प्रतिवादी हे एकाच कुटुंबाचे सदस्य आहेत. वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबाचे मुळ पूरुष श्री. नाना लक्ष्मण भंडारी हे होते. त्यांना वासुदेव नाना भंडारी उर्फ पाटील, श्री. काशीनाथ नाना भंडारी उर्फ पाटील, श्रीमती लक्ष्मीबाई नाना भंडारी उर्फ पाटील उर्फ श्रीमती लक्ष्मीबाई अर्जुन ठाकूर अशी तीन अपत्ये होती. वासुदेव नाना पाटील व त्यांची पत्नी श्रीमती बेबीबाई वासूदेव पाटील हे मयत झाले असून त्यांच्या पश्चात वादी व प्रतिवादी क्र. १ ते ६ व निर्मला वासूदेव पाटील उर्फ निर्मला बाळकृष्ण मोरे अशी अपत्ये

आहेत. त्यापैकी निर्मला वासूदेव पाटील मयत झाल्या व त्यांच्या पश्चात त्यांना प्रतिवादी क्र.७ ते ९ हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. काशिनाथ नाना पाटील व त्यांच्या पत्नी मयत आहेत. त्यांना अपत्ये नाहीत. तसेच श्रीमती लक्ष्मीबाई नाना भंडारी उर्फ पाटील उर्फ श्रीमती लक्ष्मीबाई अर्जुन ठाकूर या सुध्दा मयत असून त्यांना प्रतिवादी क्र.१० ते १९ असे वारस आहेत. दावा मिळकतीची वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबामध्ये कधीही वाटणी झालेली नव्हती व नाही. वाद मिळकत क्र.१ मध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ ते ९ यांचा सामाईकपणे अविभाज्य १/२ हिस्सा आहे आणि प्रतिवादी क्र.१० ते १९ यांचा अविभाज्य १/२ हिस्सा आहे. दावा मिळकत क्र.२ व ३ मध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचा अविभाज्य हिस्सा होता व आहे. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ६ व प्रतिवादी क्र.७ ते ९ यांचा दावा मिळकत क्र.२ व ३ मध्ये प्रत्येकी १/८ हिस्सा होता व आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी हे दावा मिळकत क्र.१ ते ३ चे कोपार्सनर्स ठरतात. वासुदेव नाना पाटील यांनी कोणतेही मृत्यूपत्र किंवा इच्छापत्र केलेले नसताना दिनांक १४/११/१०११ रोजीच्या तथाकथीत इच्छापत्राने महसुल दप्तरी फेरफार क्र.२६७६३ घडविण्यात आला व त्या फेरफाराची नोटीस दिनांक २०/१२/२०११ रोजी वादीस मिळाली. वादीने आलेल्या नोटीसीस लेखी हरकत घेतली. सदरचे इच्छापत्र हे प्रथमदर्शनी पूर्णत: बेकायदेशीर, बनावट व बोगस असल्याचे दिसून येते. दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत दरम्यानचे कालावधीत तथाकथीत दिनांक २१/०६/२००७ रोजीच्या इच्छापत्राची महसुल दप्तरी अंमलबजावणी करुन प्रतिवादी क्र.१, ३ व ४ हे वाद मिळकतीतील जमीनी स्वत:च्या नावे करुन त्रयस्थांचे हक्क प्रस्थापीत करण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशास्थितीत वाद मिळकतीवरील वादीचे कब्जांस प्रतिवादी स्वत: अगर इतरांमार्फत हरकत अडथळा करु नये, हस्तांतर करु नये, त्रयस्थांचे हक्क हितसंबध निर्माण करु नये, विकसीत करु नये, मिळकतीची स्वरुप बदलु नये, बांधकाम करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मागणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) प्रतिवादी क्र.१ दाव्यात हजर झाले व नि.५९ प्रमाणे कैफियत व

म्हणणे सादर केले आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादीचा नि.५ चा अर्ज खरा नसून खोटा आहे तो या प्रतिवादीस मान्य नाही. प्रतिवादीच्या माहितीत नाना लक्ष्मण पाटील यांना ४ अपत्ये होती. त्याची नावे वासूदेव, काशिनाथ, लक्ष्मीबाई व तुलसीबाई. वादीने प्रस्तुत दाव्यात तुलसीबाई यादव पाटील हिच्या वारसांना पक्षकार केलेले नाही. वाद मिळकत क्र.१ या मिळकतीत लक्ष्मीबाई नाना भंडारी उर्फ लक्ष्मीबाई अर्जुन ठाकूर हिचा १/२ अविभाज्य हिस्सा होता व आहे हे वादीचे म्हणणे खरे नाही. वाद मिळकत क्र.२ मध्ये वासूदेव नाना पाटील यांनी पक्के घर बांधले आहे. वासुदेव नाना पाटील यांनी त्यांचे हयातीत कधीही मृत्यूपत्र केलेले नव्हते तसेच त्यांच्या कुटुंबाच्या मालमत्तेची वाटणी केलेली नव्हती हे म्हणणे खरे नसून या प्रतिवादीस मान्य नाही. वाद मिळकत क्र.१ ची जमीन नाना लक्ष्मण पाटील कुळ म्हणून लागवड करीत होते व कुळ कायद्यातील तरतुदीप्रमाणे त्याची विक्री झाली. नाना पाटील मयत झाल्यानंतर वारस म्हणून त्यांचे वारस म्हणून वासूदेव, काशिनाथ व लक्ष्मीबाई यांच्या नावे करण्यात आली या बाबी वादीने पूराव्यानिशी सिध्द करावे. दावा मिळकतीपैकी मौजे माहीम येथील सर्वे क्र.९०१/३, क्षेत्र ०—०५—०० ची जमीन वासूदेव पाटील यांना त्यांच्या हयातीत वादीस कायम म्हणून विकत दिलेली आहे हे म्हणणे खरे नसून या प्रतिवादीस मान्य नाही. मौजे माहिम येथील सर्वे क्र.८२७, हिस्सा क्र.५ ची जमीन श्री. चंद्रकांत पाटील व सौ. चंद्रकला पाटील यांनी वासूदेव व यमुना यांचेकडून दिनांक १७/०२/२००६ रोजी नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी केली आहे म्हणणे खरे नाही व या प्रतिवादीस मान्य नाही. दावा मिळकत क्र.१ ते ३ ही वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये कधीही वाटणी झालेली नव्हती. दावा मिळकत क्र.१ मध्ये वासूदेव यांचे वारस म्हणजेच वादी व प्रतिवादी क्र.१ ते ९ यांचा सामाईक अविभाज्य आहे व श्रीमती लक्ष्मीबाई यांचे वारस प्रतिवादी क्र.१० ते १९ यांचा अविभाज्य १/२ हिस्सा आहे हे म्हणणे खरे नसून या प्रतिवादीस मान्य नाही. प्रस्तुत दाव्यातील मृत्यूपत्राबाबतची जाहिरात अगर वाटप व मनाई हुकूम मागण्याचे वादीस कोणतेही हक्क नाहीत तरी वादीचा मनाई हुकूमाचा अर्ज रद्द करण्यात यावा.

४)   प्रतिवादी क्र.२ यांना नि.७ व ८ प्रमाणे समन्स व नोटीसची बजावणी होवून देखील ते प्रकरणात गैरहजर राहीले सबब प्रतिवादी क्र.२ यांचेविरुध्द दावा एकतर्फी चालविण्यात येतो असा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी क्र.४ दिनांक १३/०६/२०१३ रोजी हजर झाले परंतु त्यांनी मुदतीत त्यांची कैफियत व म्हणणे दाखल केले नाही. सबब प्रतिवादी क्र.४ यांच्या विरुध्द दावा विनाकैफियत चालविण्याच्या आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी  क्र.३, ५, ६ व १० ते १९ दाव्यात हजर झाले व नि.६१ प्रमाणे कैफियत व म्हणणे सादर केले आहे. प्रतिवादींचे असे कथन आहे की, अर्जात नमुद केलेला मजकूर खरा व बरोबर आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी यापूर्वी सन २००५ साली वासूदेव नाना पाटील यांचे खोटे व बनावट त्यांच्या इच्छेविरुध्द इच्छापत्र श्री. वासूदेव नाना पाटील यांना मान्य नसल्याने त्यावर सही केलेली नव्हती. वासुदेव नाना पाटील यांच्या हयातीतच प्रतिवादी क्र.१ यांना त्यांच्या इच्छेविरुध्द असलेल्या मृत्यूपत्राच्या आधारे त्यांच्या मालकीची मिळकत बळकावीता आली नाही म्हणून त्यांच्या मृत्यूपश्चात प्रतिवादी क्र.१ यांनी वासूदेव नाना पाटील यांचे खोटे, बनावट, बोगस मृत्यूपत्र निर्माण करुन त्या आधारे दावा मिळकतीवर हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न हे प्रतिवादी करीत आहेत.  वासुदेव नाना पाटील यांच्या मृत्यूपश्चात खोटे बनावट त्यांचे इच्छापत्र बनवून त्या माध्यमातुन दावा मिळकत हे प्रतिवादी गिळंकृत करण्याच्या प्रयत्नात आहेत त्यामुळे प्रथमदर्शनी इच्छापत्र बोगस बनावट असल्याचे दिसून येते. वरील सर्व कारणास्तव प्रतिवादींचा हिस्सा स्वतंत्र पृथक करुन देण्यात यावा.

५)   प्रतिवादी क्र. ७ ते ९ दाव्यात हजर झाले.  प्रतिवादी क्र. ३, ५, ६ व १० ते १९ यांनी दाखल केलेले म्हणणे नि.६१ हेच प्रतिवादी क्र. ७ ते ९ यांचे म्हणणे असल्याची पुरसीस नि.६२ प्रमाणे देण्यात आली.

६)   दोन्ही बाजूंची कथने, दोन्ही बाजूंनी दाखल केलेली कागदपत्रे पहाता खालील मुद्दे विचारार्थ घेतले आहे. या मुद्दयांवरील निष्कर्ष पुढील कारणमिमांसाधारे नमूद केले आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| (१) दाव्यातील परिस्थिती सकृत दर्शनी वादीच्या बाजूने आहे असे वादी शाबीत करतात काय? | ... | अंशतः होकारार्थी |
| (२) न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय? | ... | अंशतः होकारार्थी |
| (३) वादीच्या अर्जात मागणी केल्याप्रमाणे तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे काय? | ... | अंशतः होकारार्थी |
| (४) आदेश काय ? | | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## —: कारणमिमांसा :—

७) दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेतली. वादीतर्फे वकील श्री. आर. आर. पाल व प्रतिवादी क्र.१ तर्फे वकील श्री. आर. एस. ठाकूर, प्रतिवादी क्र.२ एकतर्फी. प्रतिवादी क्र.३ ते ६, १० ते १९ तर्फे वकील श्री. आर. एस. मोगरे, प्रतिवादी क्र.४ तर्फे वकील कु. टी. एस. ठाकूर आणि प्रतिवादी क्र.७ ते ९ साठी वकील श्रीमती पी. आर. मोगरे यांचा युक्तिवाद ऐकला.

## मुद्दे क्र. १ ते ३ साठी

८) प्रस्तुतचा दावा वादी यांनी वाद मिळकतीमध्ये त्यांच्या हिश्श्यातील सरसनिरस तुटक मानाने वाटप करुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. मयत वासूदेव पाटील यांनी त्यांच्या हिश्श्याचे कधीही मृत्यूपत्र केले नव्हते, जे काही मृत्यूपत्र केले आहे असे प्रतिवादीचे कथन आहे ते बनावट आहे असे वादीनी युक्तीवादात कथन केले. वादीतर्फे युक्तीवाद करताना वकील श्री. आर. आर. पाल यांनी असे प्रतिपादन केले की, वाद मिळकती या प्रतिवादी हे विक्री करण्याच्या तयारीत आहेत व निव्वळ मृत्यूपत्राने मिळकती त्यांच्या हक्कात देण्यात आल्या आहेत याचा गैरफायदा प्रतिवादी घेण्याच्या तयारीत आहेत.

९) प्रतिवादीतर्फे वकील श्री. आर. एस. ठाकूर आणि वकील श्री.

आर. एस. मोगरे यांनी युक्तीवाद केला. युक्तीवादामध्ये असे प्रतिपादन करण्यात आले की, वादीच्या हक्कात सन २००६ साली कोणतेही खरेदीखत करण्यात आले नव्हते. तसेच सर्वे क्र.८२७/५ ही मिळकत वासूदेव नाना पाटील यांनी खरेदीखताने यमुनाबाई काशिनाथ पाटील यांना कधीही विक्री केलेली नाही. यदाकदाचीत ही मिळकत विक्री करण्यात आली असेल तर त्याचा उल्लेख वासूदेव यांच्या मृत्यूपत्रामध्ये मयत वासूदेव यांनी केला नसता.

१०) वाद मिळकती या वासूदेव नाना पाटील यांच्या वडीलोपार्जीत आहेत किंवा नाहीत. तसेच वाद मिळकती संदर्भात वासूदेव नाना पाटील यांनी त्यांची शारिरीक व मानसिक स्थिती चांगली असताना आणि वाद मिळकती वडीलोपार्जीत असून त्यामध्ये त्यांच्या हिश्श्यापुरते अस्तित्वात येणारे मृत्यूपत्र मयत वासूदेव यांनी केले होते का? या विवादास्पद बाबी बाबत दाव्याच्या कामी सखोल पूरावा नोंदविला जाणे अद्याप बाकी आहे. दावा वाटपाचा आहे व दरम्यानच्या कालावधीत प्रतिवादी यांनी वासूदेव नाना पाटील यांच्या मृत्यूपत्राच्या आधारे वाद मिळकतीचा ७/१२ उताऱ्याला स्वत:ची नावे लावून घेतली आणि त्या नावाच्या आधारे वाद मिळकतीचे त्रयस्थ इसमांना तारण, गहाण, बक्षिस, विक्री किंवा अन्यप्रकारे हस्तांतरण केल्यास त्यामुळे तथाकथीत वडीलोपार्जीत मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचा हक्क हितसंबंध निर्माण होण्याची शक्यता आहे व तसे झाले तर दाव्याच्या मिळकती संदर्भात बदल होण्याचे व तसे बदल वाद मिळकती यांचे नुकसान करणारे ठरणार असल्याचे दिसून येते. याउलट दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत प्रतिवादी यांनी वाद मिळकतीच्याबाबत त्रयस्थ इसमांचा हक्क हितसंबंध निर्माण करु नये असा तुर्तातुर्त ताकीद आदेश पारीत केला गेल्यास त्यामुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार असल्याचे दिसून येत नाही. दाव्याचे कामी मृत्यूपत्र शाबीत होण्याचे आहे तसेच वाद मिळकती या वडीलोपार्जीत आहेत किंवा नाहीत हे देखील सखोल पूराव्याअंती ठरणारे आहे. अशास्थितीत दाव्याच्या कामी अंशत: प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजूने आहे व न्यायाचा तराजू देखील वादीच्याच बाजूने आहे. दाव्याचा अंतिम निकालापर्यंत प्रतिवादी यांनी तारण, गहाण, दान,

बक्षिस किंवा अन्यप्रकारे वाद मिळकतीचे हस्तांतरण करु नये असा ताकीद आदेश पारीत केला गेल्यास त्यामुळे प्रतिवादीचे नुकसान होणार असल्याचे दिसून येत नाही. सबब मुद्दे क्र. १ ते ३ यांचा निष्कर्ष अंशत: होय असा नोंदविण्यात येतो व ताकीद आदेश अर्जाकामी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## **<u>आ दे श</u>**

१) निशाणी ५ वरील अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) दाव्याच्या कामी पुढील आदेशापर्यंत दावा मिळकतीचे तारण, गहाण, बक्षिस, दान, विक्री किंवा अन्यप्रकारे प्रतिवादी यांनी स्वत: अगर इतरांमार्फत हस्तांतरण करु अथवा करवू नये असा तुर्तातुर्त ताकीद आदेश प्रतिवादी यांना देण्यात येतो.

३) खर्चाबाबत आदेश मूळ दाव्यात करण्यात येतील.

पालघर.                                        (स. द. कामत)
दिनांक : ०५/०३/२०१४          सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
                                                      पालघर.